# Government College of Education, Panvel

## Science Club

## Report:  National Mathematics Day

The Government College of Education, Panvel, in collaboration with Amardeep Child Development Foundation, organized a workshop titled "गणितावर बोलू काही" on the occasion of National Mathematics Day. The event was held on Tuesday, 24th December 2024, in the Saraswati Hall of the college. The program was presided over by the esteemed Principal, Dr. Raamaa Bhoslay madam. The keynote speaker was Mr. Pradhan Kulkarni, a teacher at R.J. Thakur Vidyamandir, Thane, while Dr. Anita Vibhandik mam, Director of the Brain Development Study Center, graced the event as the chief guest. The guidance and organization of the program were led by Prof. Dr. Priyanka Subhedar mam.

The event began with a lamp-lighting ceremony and Saraswati Vandana. The welcome session featured a melodious invocation and welcome song performed by first-year teacher trainee Mr. Akash Rathod and his team. Prof. Dr. Nilima More mam introduced the distinguished guests and speakers.

In commemoration of the birth anniversary of the great Indian Mathematician Srinivasa Ramanujan, National Mathematics Day is celebrated on 22nd December every year. On this occasion, Miss. Anagha Mhatre shared insights into Ramanujan's contributions to Mathematics. Mrs. Velansiya Belwalkar captivated the audience with a beautiful poem centered on mathematics, inspiring the younger generation to embrace the subject. Science Club members performed a special song on mathematics, highlighting its significance in our lives.

Anchored by Mrs. Smital Kurup, the event also featured an engaging segment on the magic of numbers and a unique perspective on the upcoming year 2025. Miss. Mayuri Behere emphasized the importance of understanding numbers and their practical applications. The Principal, Dr. Raamaa Bhoslay madam, unveiled a poster showcasing the significance of Ramanujan's famous number, 1729 prepared by first year student teacher Mr. Shriram fuphane. Additionally, a magazine titled "Beauty of Golden Ratio," showcasing examples of this Mathematical concept found in nature and art, was also released.

The key note speaker, Mr. Pradhan Kulkarni, delivered an enlightening session tracing the evolution of mathematics and mathematicians from ancient to modern times. His interactive approach included intriguing puzzles and number games, which entertained and educated the audience. Chief Guest Dr. Anita Vibhandik introduced the participants to the various branches of Mathematics and the opportunities they offer.

Mr. N.D. Khan sir, founder of Amardeep Child Development Foundation, expressed his gratitude and shared his thoughts on the event. The program concluded with Mr. Rajkumar Tagmoge sir, Coordinator of the Foundation, demonstrating effective ways of learning multiplication tables.

The event was efficiently hosted by Mrs. Smital Kurup, student leader of the Science Club. The workshop left participants enriched with knowledge and inspired to explore the world of Mathematics further.




Hon. Principal of the college, Dr. Raamaa Bhoslay Madam, lighting the lamp.




Mrs. Smital Kurup, the student teacher head of the Science club, anchoring the program.




Hon. Principal Dr. Raamaa Bhoslay madam, welcoming the workshop expert guide, Mr. Pradhan Kulkarani Sir




Prof. Dr. Nilima More mam, delivering the introductory remarks and introducing the guests.




B.Ed. first year student teacher Mr. Akash Rathod and his team presenting the welcome song.




Miss. Anagha Mhatre explaining the contributions of Mathematical genius Srinivasa Ramanujan.




Hon. Principal Dr. Raamaa Bhoslay madam, unveiling the "Beauty of Golden Ratio" Magazine.




The Workshop's expert guide, Mr. Pradhan Kulkarni sir discussing Mathematics with the student teachers




Chief Guest Dr. Anita Vibhandik Mam, delivering her guidance to student teachers.




Co-organizer and founder of Amardeep Child Development Foundation, Mr. N.D. Khan Sir, Sharing his thoughts.



# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल
# आणि अमरदीप बालविकास फाउंडेशन



## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
## " राष्ट्रीय गणित दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन कार्यशाळा "

## निमंत्रण पत्रिका

आपणास कळवण्यास आनंद होत आहे की, **दिनांक - २४ डिसेंबर, २०२४** रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे **"राष्ट्रीय गणित दिनाच्या"** निमित्ताने मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### अध्यक्ष
**मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले**
**( शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल )**

### प्रमुख वक्ते
**मा. श्री. प्रधान कुलकर्णी**
**( रा. ज. ठाकूर विद्या मंदिर, ठाणे )**

**मा. डॉ. अनिता विभांडिक**
**( संचालिका, ब्रेन डेव्हलपमेंट स्टडी सेंटर, पनवेल )**

### मार्गदर्शक व आयोजक
**मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार**

### सह आयोजक
**मा. श्री. एन. डी. खान**

### सन्माननीय उपस्थिती
**मा. प्रा. बिजली दडपे**
**मा. प्रा. डॉ. बी. जी. खाडे.**
**मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे**
**मा. प्रा. डॉ. उज्ज्वला डोणे**

**स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल ( एस. टी. स्टॅन्ड जवळ )**

**दिनांक : २४ डिसेंबर, २०२४**
**वेळ : सकाळी ११.३०**

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल आणि अमरदीप बालविकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## " राष्ट्रीय गणित दिनाच्या निमित्ताने मार्गदर्शन कार्यशाळा"

### कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन | मा. प्राचार्य, सन्माननीय पाहुणे व प्राध्यापक वृंद यांच्या हस्ते |
| स्वागतगीत | श्रीमती. स्वाती घोरपडे व त्यांचा गट |
| प्रास्ताविक व अतिथी परिचय | मा. प्रा. डॉ. प्रियंका सुभेदार / मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे |
| स्वागत | प्रथम वर्ष छात्राध्यापक |
| गणिततज्ज्ञ रामानुजन विषयी माहिती | श्रीमती. अनघा म्हात्रे |
| कविता वाचन | श्रीमती. वेलांसिया बेलवलकर |
| गणित गीत | प्रथम वर्ष छात्राध्यापक |
| छात्राध्यापकांचे भाषण | श्रीमती. मयुरी बेहेरे |
| पोस्टरचे अनावरण | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| विशेषांकाचे प्रकाशन | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| गणितातील गमती जमती | श्रीमती. स्मितल कुरूप |
| तज्ज्ञांचे व्याख्यान | मा. श्री. प्रधान कुलकर्णी |
| वक्त्यांचे मार्गदर्शन | मा. डॉ. अनिता विभांडिक |
| सह आयोजक मनोगत | मा. श्री. एन. डी. खान |
| अध्यक्षीय भाषण | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले |
| आभार प्रकटीकरण | श्रीमती. निशा ब्राम्हणे |
| कार्यक्रमाची सांगता | राष्ट्रगीत |
| सूत्रसंचालन | श्रीमती. स्मितल कुरूप |

स्थळ : शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल ( एस. टी. स्टॅन्ड जवळ )

दिनांक : २४ डिसेंबर, २०२४
वेळ : सकाळी ११.३०

# ★ शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल ★

## विज्ञान मंडळ

## राष्ट्रीय गणित दिवस

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय पनवेल आणि अमरदीप बाल विकास फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय गणित दिनानिमित्त मार्गदर्शन कार्यशाळा **'गणितावर बोलू काही'** मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी महाविद्यालयाच्या सरस्वती कक्षामध्ये आयोजित करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले या होत्या. रा. ज. ठाकूर विद्यामंदिर ठाणे येथील शिक्षक श्री. प्रधान कुलकर्णी हे प्रमुख मार्गदर्शक व ब्रेन डेव्हलपमेंट स्टडी सेंटरच्या संचालिका डॉ. अनिता विभांडिक या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून लाभल्या. कार्यक्रमाचे मार्गदर्शन व आयोजन प्राध्यापिका डॉ. प्रियांका सुभेदार यांनी केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाच्या स्वागत सोहळ्यामध्ये प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री.आकाश राठोड व गटाने ईशस्तवन व स्वागतगीताच्या स्वरांचे रंग मिसळले. प्राध्यापिका डॉ. नीलिमा मोरे यांनी कार्यक्रमाला लाभलेले मार्गदर्शक व अतिथी यांचा परिचय करून दिला. भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त २२ डिसेंबर हा राष्ट्रीय गणित दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या गणितातील योगदानाबद्दल श्रीमती अनघा म्हात्रे यांनी सर्वांना माहिती करून दिली. श्रीमती वेलन्सिया बेलवलकर यांनी सुंदर अशा गणितावर आधारलेल्या कवितेतून नव्या पिढीला गणिताचा अनुभव करून देण्याचे सांगितले. गणिताने जगाला काय दिले हे सांगत विज्ञान मंडळातील सदस्यांनी गणितगीत सादर केले. सूत्रसंचालक श्रीमती स्मितल कुरूप यांनी अंकांची गंमत सांगत नवीन वर्ष २०२५ ची विशेष मांडणी देखील आखली. श्रीमती मयुरी बेहेरे यांनी अंकांच्या दुनियेचे सर्वांना महत्त्व पटवून दिले. महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी रामानुजन यांचा विशेष अंक १७२९ याचे विशेषत्व सांगणाऱ्या पोस्टरचे अनावरण केले. सौंदर्याने नटलेल्या गोष्टींमध्ये आढळून येणारी एक सुंदर अशी संकल्पना गोल्डन रेशो, या गोल्डन रेशो

दिसून येणाऱ्या उदाहरणांचे संकलन केलेल्या 'Beauty of Golden Ratio' मासिकाचे अनावरण मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले यांनी केले.

कार्यशाळेचे तज्ञ मार्गदर्शक श्री प्रधान कुलकर्णी यांनी इतिहास काळापासून ते नवयुगापर्यंतच्या टप्प्यांतील गणित व गणितज्ञ यांची सर्वांना ओळख करून दिली. गणिताचे हे महत्त्व सांगत असताना त्यांनी अनेक कोडी व अंकांच्या गमती जमती सर्वांना सामावून घेत मनोरंजकपणे करून घेतल्या. कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. अनिता विभांडिक यांनी गणिताची आवड असणाऱ्यांसाठी उपलब्ध असलेल्या गणिताच्या अनेक शाखांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे सहयोजक अमरदीप बालविकास फाउंडेशनचे संस्थापक श्री. एन. डी. खान यांनी आपले मनोगत व्यक्त करत मान्यवरांचे आभार मानले. अमरदीप बालविकास फाउंडेशनचे समन्वयक श्री राजकुमार तागमोगे यांनी पाढे कसे तयार करायचे हे सांगत कार्यक्रमाची सांगता केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विज्ञान मंडळाच्या विद्यार्थी प्रमुख श्रीमती स्मितल कुरूप यांनी केले.




महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले दीपप्रज्वलन करताना




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना विज्ञान मंडळाच्या विद्यार्थी प्रमुख श्रीमती स्मितल कुरूप




कार्यशाळेचे तज्ञ मार्गदर्शक श्री. प्रधान कुलकर्णी यांचे स्वागत करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले




कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अतिथी परिचय करताना प्राध्यापिका डॉ. नीलिमा मोरे




प्रथम वर्ष छात्राध्यापक श्री.आकाश राठोड व गट स्वागतगीत सादर करताना




गणितज्ञ रामानुजन यांचे गणितातील योगदान सांगताना श्रीमती अनघा म्हात्रे








'Beauty of Golden Ratio' मासिकाचे अनावरण करताना मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले

कार्यशाळेचे तज्ञ मार्गदर्शक श्री. प्रधान कुलकर्णी छात्राध्यापकांसोबत गणिताची चर्चा करताना







कार्यक्रमाच्या अतिथी डॉ. अनिता विभांडिक मार्गदर्शन करताना

कार्यक्रमाचे सहआयोजक अमरदीप बालविकास फाऊंडेशनचे संस्थापक श्री. एन. डी. खान मनोगत व्यक्त करताना

